**L. C. BILL No. X OF 2023.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA NATIONAL LAW UNIVERSITY ACT, 2014.

**सन २०२३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १०.**

**महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ अधिनियम, २०१४ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

२०१४ चा महा. ६.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ अधिनियम, २०१४ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

(शा.म.मु.) एचबी १३०३-१ (६०६-८-२०२३)

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ३५ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ अधिनियम, २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश, “ मुख्य अधिनियम ” असा केला आहे), याच्या कलम ३५ मधील, पोट-कलम (३) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :— २०१४ चा महा.६.

“ (३) लेखापरीक्षा केलेले लेखे कार्यकारी परिषदेकडून प्रसिद्ध करण्यात येतील आणि लेखापरीक्षा अहवालासोबत लेख्यांची एक प्रत महापरिषदेसमोर ठेवण्यात येईल आणि तसेच, ती वित्तीय वर्षाच्या समाप्तीपासून एक वर्षाच्या आत राज्य शासनाला सादर करण्यात येईल. राज्य शासन, त्यास प्राप्त झालेले विद्यापीठाचे लेखा परीक्षा केलेले वार्षिक लेखे राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे मांडण्याची व्यवस्था करील.”.

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ३७ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३७ मधील, पोट-कलम (२) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

“ (२) विद्यापीठ, वार्षिक अहवालाच्या प्रती महापरिषदेच्या त्यावरील ठरावासह विद्यावर्ष समाप्त झाल्या पासून एक वर्षाच्या आत राज्य शासनाला सादर करील. राज्य शासन, त्या प्रती, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर त्यांच्या लगतनंतरच्या येणाऱ्या अधिवेशनात ठेवील.”.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ अधिनियम, २०१४ (२०१४ चा महा. ६) याच्या कलम ३५ च्या पोट-कलम (१) व (२) मध्ये कार्यकारी परिषदेच्या निदेशान्वये, राष्ट्रीय विधि विद्यापीठाचे वार्षिक लेखे तयार करण्याची आणि वर्षातून किमान एकदा लेखापरीक्षा करण्याची तरतूद आहे. उक्त कलम ३५ च्या पोट-कलम (३) मध्ये अशी तरतूद आहे की, लेखापरीक्षा झाल्यावर कार्यकारी परिषदेकडून लेखे प्रसिद्ध करण्यात येतील आणि लेखापरीक्षा अहवालासोबत लेख्यांची एक प्रत महापरिषदेसमोर ठेवण्यात येईल आणि तसेच ती राज्य शासनास सादर करण्यात येईल. तथापि, विद्यापीठाकडून राज्य शासनाला अशा लेख्यांची एक प्रत सादर करण्यासाठीचा विनिर्दिष्ट कालावधी आणि राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर लेखा परीक्षा केलेले वार्षिक लेखे ठेवण्याबाबतची तरतूद उक्त पोट-कलम (३) मध्ये केलेली नाही.

म्हणून, वित्तीय वर्षाच्या समाप्तीपासून एक वर्षाच्या आत राज्य शासनाला त्यावरील लेखापरीक्षा अहवाला-सोबत लेख्यांची एक प्रत सादर करण्यासाठीची तरतूद करण्यासाठी आणि ते राज्य विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर मांडण्यासाठी उक्त कलम ३५ च्या पोट-कलम (३) मध्ये सुधारणा करणे इष्ट वाटते.

**२.** उक्त अधिनियमाच्या कलम ३७ च्या पोट-कलम (१) मध्ये कार्यकारी परिषद ही महापरिषद विनिर्दिष्ट करील अशा तपशिलांचा अंतर्भाव असलेला वार्षिक अहवाल तयार करण्याची तरतूद आहे. उक्त कलम ३७ चे पोट-कलम (२) मध्ये वार्षिक अहवालाच्या प्रती, महापरिषदेच्या त्यावरील ठरावासह राज्य शासनाला सादर करण्यात येतील आणि राज्य शासन, येणाऱ्या लगतनंतरच्या अधिवेशनात, त्या प्रती, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर ठेवण्याची तरतूद आहे. तथापि, उक्त पोट-कलम (२) मध्ये, विद्यापीठाद्वारे, राज्य शासनाकडे वार्षिक अहवालाची प्रत सादर करण्यासाठी विनिर्दिष्ट कालमर्यादेची तरतूद करण्यात आलेली नाही.

विद्यावर्ष समाप्त झाल्यापासून एक वर्षाच्या आत वार्षिक अहवालाची प्रत राज्य शासनास सादर करण्याची तरतूद करण्यासाठी उक्त कलम ३७ च्या पोट-कलम (२) मध्ये सुधारणा करणे इष्ट वाटते.

**३.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ३१ जुलै, २०२३.

**चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.

## सन २०२३ चे वि. प. विधेयक क्रमांक १० महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३ —याचे परिशिष्ट

**(महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ अधिनियम, २०१४ यातील उतारे.)**

**(सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६.)**

**१.** ते **३४.** * * * *

**३५.** (१) व (२) * * * * वार्षिक लेखे व लेखापरीक्षा.

(३) लेखापरीक्षा केलेले लेखे कार्यकारी परिषदेकडून प्रसिद्ध करण्यात येतील आणि लेखापरीक्षा अहवालासोबत लेख्यांची एक प्रत महापरिषदेसमोर ठेवण्यात येईल. तसेच ती राज्य शासनाला सादर करण्यात येईल.

(४) * * * *

**३६.** * * * *

**३७.** (१) * * * * वार्षिक अहवाल.

(२) वार्षिक अहवालाच्या प्रती, महापरिषदेच्या त्यावरील ठरावासह राज्य शासनाला सादर करण्यात येतील. राज्य शासन येणाऱ्या आगामी अधिवेशनात, त्या प्रती, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर ठेवील.

**३८.** ते **५३.** * * * *

**अनुसूची.** * * * *

# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**[सन २०२३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १०.]**

**[महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ अधिनियम, २०१४ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक. ]**

**[श्री. चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्रशिक्षण मंत्री.**]**

**जितेंद्र भोळे,**

सचिव (१) कार्यभार,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई